## मा. मुख्यमंत्री महोदयांबरोबर दिनांक २४/०९/२०१५ रोजी दुपारी १.३० वाजता मा. राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र यांनी केलेल्या बैठकीचे इतिवृत्त

मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते दिनांक २४/९/२०१५ रोजी राज्य निवडणूक आयोगाच्या नुतनीकृत कार्यालयाचे फित कापून उदघाटन करण्यात आले. त्याप्रसंगी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे मा. राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले व त्यांनी आपला अमूल्य वेळ सदर कार्यक्रमास दिल्याबाबत आभार व्यक्त केले.

उदघाटन समारंभानंतर, मा. मुख्यमंत्री व इतर उपस्थित अधिकारी यांच्यासोबत एक बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीस राज्य निवडणूक आयुक्त ज.स. सहारिया व आयोगाचे अधिकारी तसेच ग्राम विकास विभागाचे प्रधान सचिव व्ही. गिरीराज, महसूल विभागाचे प्रधान सचिव मनुकुमार श्रीवास्तव, राज्य निवडणूक आयोगाचे सचिव डॉ. प्रदीप व्यास, मुख्यमंत्र्यांचे सचिव प्रवीण दराडे व सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव विवेक नाईक यावेळी उपस्थित होते.

सदर बैठकीमध्ये राज्य निवडणूक आयोगाकडून आयोगाच्या कामकाजाविषयी व भविष्यातील योजनांविषयी सविस्तर पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन सादर करण्यात आले. त्यामध्ये प्रामुख्याने खालील बाबींचा उल्लेख करण्यात आला :-

(i) ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीनुसार १९९२ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याकामी राज्य निवडणूक आयोगाची निर्मिती करण्यात आली व त्यानुसार महाराष्ट्र राज्यात दिनांक २६ एप्रिल, १९९४ रोजी राज्य निवडणूक आयोगाची स्थापना झाली.

(ii) राज्य निवडणूक आयोग व भारत निवडणूक आयोगाच्या कामाची व्याप्ती पाहता राज्य निवडणूक आयोगास ५ वर्षात सर्वसाधारणपणे २८,५३० विविध स्थानिक स्वराज्य संस्थांच्या

निवडणुका घ्याव्या लागतात. सदर निवडणुकांचे कामकाज वर्षभर चालते. त्यातून ५ वर्षात सुमारे ३.०० लाख प्रतिनिधी निवडले जातात. निवडणूक निर्णय अधिकारी यांचा दर्जा, संबंधित कायद्यातील विभिन्नता व कामाची व्याप्ती (प्रभाग रचना ते प्रत्यक्ष निवडणूक) यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कशा अधिक क्लिष्ट आहेत, याचा विशेष उल्लेख करण्यात आला.

(iii) सिव्हिल ॲप्लिकेशन क्रमांक-५७५६/२००५ या प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या महत्वपूर्ण निर्णयातील राज्य निवडणूक आयोगाचा दर्जा व अधिकारांविषयी मुद्दयांचे विवेचन करण्यात आले.

(iv) मा. आयुक्त, राज्य निवडणूक आयोग यांनी गेल्या वर्षभरातील राज्य निवडणूक आयोगाने हाती घेतलेल्या विविध नाविन्यपूर्ण बाबींचा उल्लेख केला, त्यामध्ये प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश आहे :-

(अ) लोकसभा/विधानसभा निवडणुकीमध्ये घेण्यात येणारी दक्षता व काळजी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्येही घेण्यात आली.

(ब) सर्व सार्वत्रिक निवडणुकांसाठी अतिरिक्त जिल्हाधिकारी / उप जिल्हाधिकारी संवर्गाचे व तसेच त्या दर्जाच्या निवडणूक निरीक्षकांची नेमणूक करण्यात आली.

(क) विहित अटी पूर्ण न करणाऱ्या सन २००५ मध्ये नोंदणी केलेल्या १६ राजकीय पक्षांची नोंदणी रद्द करण्यात आलेली आहे.

(ड) निवडणूक प्रक्रियेमध्ये संगणकीकरणाचा जास्तीत जास्त वापर करण्यात येत आहे.

(इ) सहज, सुलभ संगणकीकृत प्रतिज्ञापत्र व नामनिर्देशनपत्राचे नमुने तयार करण्यात आले आहेत.

(फ) ट्रू व्होटर, एसईसी कमांडर यासारखे मोबाईल ॲप्लिकेशन, राजकीय पक्ष, उमेदवार, निवडणुकीतील कर्मचारीवर्ग व सामान्य जनता यांच्यासाठी

निवडणूकविषयक नेहमी विचारले जाणारे प्रश्न (FAQ), निवडणूक निर्णय अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष यांच्याकरिता सोप्या भाषेतील माहितीपुस्तिका (HANDBOOK) तयार करणे, इत्यादी कामे हाती घेण्यात आली.

(ग) मतदार जागृती अभियानांतर्गत सक्रीय सहभाग घेण्यात येत आहे.

तसेच पुढील काळात इन्स्टिटयूट ऑफ डेमोक्रसी ॲण्ड इलेक्शन मॅनेजमेंट, नवी दिल्ली यांच्या धर्तीवर स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी संशोधन, विश्लेषण व प्रशिक्षण याकरिता एक संस्था स्थापित करण्याची योजना आहे.

२. वरील प्रस्तावनेनंतर खालील मुद्दयांवर सविस्तरपणे चर्चा झाली. चर्चेअंती मा. मुख्यमंत्री यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिला:-

| अ.क्र. | राज्य शासनाकडून कार्यवाही अपेक्षित आहे असे मुद्दे / विषय | शासनाचे विभाग | निर्णय |
|---|---|---|---|
| १. | **प्रशासकीय स्वातंत्र्य –**<br>(अ) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची प्रक्रिया सुरु असताना संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची आयोगाच्या परवानगीशिवाय बदली न करणे.<br>(ब) राज्य निवडणूक आयोगामध्ये निवडणुकीच्या कामकाजाचे योग्य ज्ञान असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांची मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्याशी सल्लामसलत व सहमतीने नियुक्ती करणे. | अतिरिक्त मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग | **सर्व संबंधित प्रशासकीय विभागांनी त्यांच्याशी संबंधित मुद्दयांचा अभ्यास करून आवश्यकतेप्रमाणे प्रस्तावित निर्णय सादर करावा. अपर मुख्य सचिव (गृह) यांनी सर्व प्रशासकीय विभागांशी समन्वय साधून याविषयी अंतिम आदेश एक महिन्याच्या आत निर्गमित होतील, असे पहावे.** |
| २. | महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करून संबंधित जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यांवर ग्रामपंचायत निवडणुकांची जबाबदारी निश्चित करणे. | प्रधान सचिव, महसूल व वन विभाग | |
| ३. | मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १९/१०/२००६ रोजी दिलेल्या निर्णयानुसार राज्य निवडणूक आयुक्त (अर्हता व नियुक्ती) अधिनियम, १९९४ मध्ये सुधारणा करून राज्य निवडणूक आयुक्त यांना भारत निवडणूक आयोगाच्या मुख्य निवडणूक आयुक्तांचा समकक्ष दर्जा देणे. (विशेषत: राजशिष्टाचार, Order of Precedence, इ.संदर्भात) | अतिरिक्त मुख्य सचिव (राजशिष्टाचार), सामान्य प्रशासन विभाग | |
| ४. | **आर्थिक स्वातंत्र्य**<br>(i) **निवडणूक खर्च** –<br>लोकसभा/विधानसभा निवडणुकांमध्ये जी खर्चाची मानके निश्चित करण्यात येतात त्याच धर्तीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी आवश्यकतेप्रमाणे निधी उपलब्ध करून द्यावा. | प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, अतिरिक्त मुख्य सचिव (वित्त) | |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | २०१६-१७ मध्ये होणाऱ्या नवनिर्मित नगर परिषदा/नगर पंचायत निवडणुकांसाठी त्या आर्थिक दृष्टया कमकुवत असल्याने शासन स्तरावरून निधी उपलब्ध करून द्यावा. | सचिव, नगर विकास विभाग (२) | |
| ६. | आर्थिक वर्ष- २०१६-१७ मध्ये जवळपास ८०% जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुका होणार आहेत. त्यासाठी सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद करण्यात यावी. | प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग | |
| ७. | नवीन प्रशासन भवनातील १८ व्या मजल्यावरील वितरीत करण्यात आलेली जागा नव्याने सुरु करण्यात येणाऱ्या खालील प्रकल्पांकरिता आयोगास देण्यात यावी.<br>(i) संशोधन आणि विश्लेषण<br>(ii) संगणकीकरण<br>(iii) इन्स्टिटयूट ऑफ डेमॉक्रसी ॲण्ड इलेक्शन मॅनेजमेंट | अतिरिक्त मुख्य सचिव, (राजशिष्टाचार) सामान्य प्रशासन विभाग | |
| ८. | जून-२०१६ पूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या संदर्भातील ५ अधिनियमातील तरतुदींमध्ये एकसूत्रता आणणे. | प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, नगर विकास विभाग (२) | |
| ९. | भारतीय संविधानातील ७३ वी व ७४ वी घटना दुरुस्तीस २५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल समारंभाचे आयोजन व त्यासाठी अर्थसंकल्पीय तरतूद यासाठी एक उच्चस्तरीय समितीची स्थापना करणे. | प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग व सचिव, नगर विकास विभाग (२) | |

बैठकीच्या शेवटी, राज्य निवडणूक आयोगाचे सचिव, डॉ. प्रदीप व्यास यानी मा. मुख्यमंत्री महोदयांचे व उपस्थितांचे आभार मानले.